0 4 NOV 2026
सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात मंगळवारी 'न्या. म. गो. रानडे : काळ आणि कर्तृत्व' विषयावरील कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना कुलगुरू डॉ. आर. के. कामत. यावेळी डावीकडून डॉ. नीरज हातेकर, किशोर बेडकिहाळ, ज्योती जाधव, अवनीश पाटील.

विविध विचारप्रवाहांमध्ये संवाद हाच रानडे यांच्या प्रबोधनाचा संदेश

डॉ. कामत : विद्यापीठात कार्यशाळेला प्रारंभ

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ३ : 'विचारांमधील मतभेद समाजाच्या प्रबोधनासाठी आवश्यक असले, तरी त्यातून मनभेद निर्माण होऊ नयेत. विविध विचारप्रवाहांमध्ये संवाद कायम ठेवणे, हीच महाराष्ट्राच्या प्रबोधन परंपरेची खरी ताकद आहे. आजच्या काळात न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचा हा विचार अधिक समर्पक आहे,' असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागातर्फे 'न्या. महादेव गोविंद रानडे : काळ आणि कर्तृत्व' या विषयावर घेण्यात आलेल्या दोनदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकिहाळ, अर्थशास्त्रज्ञ डॉ. नीरज हातेकर प्रमुख उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. कामत म्हणाले, 'रानडे यांचे कर्तृत्व समजून घेण्यासाठी त्यांचा काळ समजून घेणे आवश्यक आहे. रानडे हे बहुआयामी व्यक्तिमत्त्व होते. त्यांचे मोठेपण केवळ त्यांनी भूषविलेल्या पदांमध्ये नसून त्यांनी उभारलेल्या संस्थांमध्ये आहे. या कार्यशाळेत होणाऱ्या विचारमंथन केवळ चर्चेपुरते मर्यादित न राहता त्याचे पुस्तकाच्या स्वरूपात प्रकाशन व्हावे. विद्यापीठातर्फे या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात येईल.'

यावेळी डॉ. अवनीश पाटील यांनी स्वागत केले. डॉ. भारती पाटील, अरुण भोसले, नागोराव कुंभार, रणधीर शिंदे, नंदकुमार मोरे, दत्तात्रय मचाले, उमाकांत हत्तीकट उपस्थित होते. डॉ. नीलांबरी जगताप यांनी आभार मानले.

'छत्रपती शिवाजी महाराजांचा उदय हा लोकशक्तीचा उदय'

■ रानडे यांच्या इतिहासविषयक दृष्टिकोनाचा संदर्भ देताना कुलगुरू डॉ. कामत म्हणाले, 'परकीय इतिहासकार मराठ्यांच्या उदयाकडे प्रामुख्याने लष्करी विजयाच्या दृष्टिकोनातून पाहत होते. मात्र, रानडे यांनी 'राईज ऑफ मराठा पॉवर' या ग्रंथातून छत्रपती शिवाजी महाराजांचा उदय हा केवळ एका राजसत्तेचा किंवा लष्करी शक्तीचा उदय नसून, तो लोकशक्तीचा उदय असल्याचे अधोरेखित केले. या भूमीची वैचारिक आणि आध्यात्मिक जडणघडण संतपरंपरेने आधीच केली होती.'

04 NOV 2026
पुढारी



कोल्हापूर : कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभात बोलताना कुलगुरू डॉ. आर. के. कामत. समवेत डॉ. नीरज हातेकर, किशोर बेडकीहाळ, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, डॉ. अवनिश पाटील.

विचारप्रवाहांतील संवाद हाच रानडे यांच्या प्रबोधनाचा संदेश

कुलगुरू डॉ. आर. के. कामत; विद्यापीठात रानडे विचारवेध कार्यशाळा उद्घाटन

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

विचारांमधील मतभेद समाजप्रबोधनासाठी आवश्यक असले तरी त्यातून मनभेद निर्माण होऊ नयेत. विविध विचारप्रवाहांमध्ये संवाद कायम ठेवणे हीच महाराष्ट्राच्या प्रबोधन परंपरेची ताकद आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागातर्फे आयोजित 'न्या. महादेव गोविंद रानडे : काळ आणि कर्तृत्व' या दोनदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकीहाळ, अर्थशास्त्रज्ञ डॉ. नीरज हातेकर उपस्थित होते.

कुलगुरू कामत म्हणाले, रानडे यांचे योगदान केवळ पदांपुरते मर्यादित नव्हते. विधवा पुनर्विवाह मंडळ, पुणे सार्वजनिक सभा, प्रार्थना समाज, डेक्कन एज्युकेशन सोसायटी आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेस यांसारख्या संस्थांच्या उभारणीत त्यांचा महत्त्वपूर्ण सहभाग होता.

डॉ. अवनिश पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नीलांबरी जगताप यांनी आभार मानले. यावेळी डॉ. भारती पाटील, डॉ. अरुण मोसले, डॉ. नागोराव कुंभार, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. दत्तात्रय मचाले. उमाकांत हत्तीकट आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 4 NOV 2026

जनप्रवास

संवाद हाच रानडेंच्या प्रबोधनाचा संदेश : कुलगुरू डॉ. कामत

जनप्रवास : कोल्हापूर

विचारांमधील मतभेद समाजाच्या प्रबोधनासाठी आवश्यक असले, तरी त्यातून मनभेद निर्माण होऊ नयेत. विविध विचारप्रवाहांमध्ये संवाद कायम ठेवणे, हीच महाराष्ट्राच्या प्रबोधन परंपरेची खरी ताकद असून आजच्या काळात न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचा विचार समर्पक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागाच्या वतीने आयोजित 'न्या. महादेव गोविंद रानडे : काळ आणि कर्तृत्व' या विषयावरील दोनदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकिहाळ आणि अर्थशास्त्रज्ञ डॉ. नीरज हातेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील आयोजित कार्यक्रमात बोलताना कुलगुरू डॉ. राजनीश कामत. सोबत डॉ. नीरज हातेकर, किशोर बेडकीहाळ, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, डॉ. अवनीश पाटील.

कुलगुरू डॉ. कामत म्हणाले, रानडे यांचे कर्तृत्व समजून घेण्यासाठी त्यांचा काळ समजून घेणे आवश्यक आहे. रानडे हे बहुआयामी व्यक्तिमत्त्व होते. त्यांचे मोठेपण केवळ त्यांनी भूषविलेल्या पदांमध्ये नसून त्यांनी उभारलेल्या संस्थांमध्ये आहे. विधवा पुनर्विवाह मंडळ, पुणे सार्वजनिक सभा, प्रार्थना समाज, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आणि राष्ट्रीय सामाजिक परिषद यांसारख्या संस्थांच्या उभारणीत त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. व्यक्ती येतात आणि जातात; मात्र संस्था विचारांना दीर्घायुष्य देतात, असा त्यांचा विश्वास होता. संस्था उभारण्यावरोबरच त्यांनी नेतृत्वही घडविले. त्यांचे शिष्य गोपाळकृष्ण गोखले यांना महात्मा गांधी यांनी आपले राजकीय गुरू मानले, तर प्रार्थना समाजाच्या विचारपरंपरेतून महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी अस्पृश्यता निवारणाचे कार्य पुढे नेले. त्यामुळे रानडे हे केवळ समाजसुधारक नव्हते, तर समाजसुधारक घडविणारे मार्गदर्शक होते, असे डॉ. कामत यांनी नमूद केले.

रानडे यांच्या इतिहासविषयक दृष्टिकोनाचा संदर्भ देताना ते म्हणाले की, परकीय इतिहासकार मराठ्यांच्या उदयाकडे प्रामुख्याने लष्करी विजयाच्या दृष्टिकोनातून पाहत होते. रानडे यांनी राईस ऑफ द मराठा पॉवर या ग्रंथातून छत्रपती शिवाजी महाराजांचा उदय हा केवळ एका राजसत्तेचा किंवा लष्करी शक्तीचा उदय नसून तो लोकशक्तीचा उदय असल्याचे अधोरेखित केले. या भूमीची वैचारिक आणि आध्यात्मिक जडणघडण संतपरंपरेने आधीच केली होती, हा विचारही त्यांनी मांडला, असेही कुलगुरूंनी सांगितले. डॉ. अवनीश पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नीलांबरी जगताप यांनी आभार मानले. डॉ. भारती पाटील, डॉ. अरुण भोसले, डॉ. नागोराव कुंभार, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. दत्तात्रय मचाले, उमाकांत हत्तीकट आदी उपस्थित होते.

व्याख्यानांचे पुस्तक व्हावे

या दोन दिवसीय कार्यशाळेत होणारे विचारमंथन केवळ चर्चेपुरते मर्यादित न राहता त्याचे पुस्तकाच्या स्वरूपात प्रकाशन व्हावे, अशी अपेक्षाही कुलगुरू डॉ. कामत यांनी व्यक्त केली. शिवाजी विद्यापीठाच्या वतीने या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

0 4 NOV 2026

सिंधुदुर्ग समाचार

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

शिक्षणातील डिजिटल परिवर्तनासाठी तंत्रज्ञानाची भूमिका महत्वाची : कुलगुरु डॉ. राजनीश कामत



कोल्हापूर/प्रतिनिधी :

शिक्षणातील डिजिटल परिवर्तनासाठी तंत्रज्ञानाची भूमिका महत्त्वाची आहे, असे प्रतिपादन कुलगुरु डॉ. राजनीश कामत यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र व महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांसाठी आयोजित 'ई -कन्टेन्ट विकसन' या विषयावरील तीन दिवसीय फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्थेच्या नवनिर्मिती आणि अद्ययावत तंत्रज्ञान केंद्र प्रमुख इंजि. सुरजकुमार बाबर, अमरावती येथील संतगाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या संगणक विभागाचे डॉ.सुहास पाचपांडे, महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्थेचे डॉ.भार्गव वाळुंज, उपकुलसचिव विनय शिंदे यांच्यासह विविध अधिविभागांतील सहाय्यक प्राध्यापक उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. कामत म्हणाले, ई-कंटेटचे महत्त्व आजच्या काळात शिक्षण क्षेत्राच्या परिवर्तनाच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचे आहे. स्वयम, मूक यांसारख्या माध्यमातून विद्यार्थ्यांना निःशुल्क स्वरूपात ज्ञान प्राप्त करण्याची संधी मिळते. कारण या कोर्सेसना प्रवेशासाठी कोणतेही शुल्क नसते, केवळ प्रमाणपत्र शुल्क असते. ई-कंटेंटच्या फोरमद्वारे विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे साहित्य उपलब्ध केले जाते. यामध्ये ई-टेक्स्ट, ई-ट्युटोरियल्स, वेब रिसोर्सेस, सेल्फ असेसमेंट इत्यादींचा समावेश असतो. शिक्षक अध्यापन कार्यात डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून ई-कन्टेन्ट तयार करणे, त्याद्वारे विद्यार्थी व शिक्षकांना प्रभावी अध्ययन-अध्यापन कार्य करता येणे अत्यंत महत्त्वाचे आहे, असे डॉ.कामत म्हणाले.

सुरजकुमार बाबर म्हणाले, शिक्षकांनी सध्याच्या बदलत्या डिजिटल गरजा ओळखून सर्व शिक्षकांनी ई-कंटेंट निर्मितीच्या आधुनिक पद्धती समजून घेऊन, दर्जेदार शैक्षणिक साहित्य तयार करणे अपेक्षित आहे, जेणेकरून विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे ज्ञान पोहोचू शकेल.

यावेळी संचालक डॉ. प्रतीभा पाटणकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. समन्वयक डॉ.कृष्णा पाटील यांनी परिचय करून दिला. प्रियांका सुर्वे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. नगीना माळी यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 4 NOV 2026 पुण्यनगरी



शिवाजी विद्यापीठ-टॅली एज्युकेशनमध्ये सामंजस्य करार

सांगली : कौशल्याधारित शिक्षणाला बळकटी देण्यासाठी आणि विद्यार्थ्यांची कामाच्या ठिकाणची पूर्वतयारी (इंडस्ट्री रेडिनेस) सुधारण्यासाठी शिवाजी विद्यापीठ आणि टॅली एज्युकेशन अँड डिस्ट्रिब्युशन सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड यांच्यात एक सामंजस्य करार करण्यात आला आहे. मुख्य प्रवाहातील शैक्षणिक अभ्यासक्रमांमध्ये प्रात्यक्षिक व उद्योगपूरक शिक्षण समाविष्ट करणे आणि विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसाठी उत्तम संधी निर्माण होणार आहे.

मुख्य उद्देश : विद्यार्थ्यांना कौशल्याधारित शिक्षण देणे, उद्योगजगताच्या गरजांनुसार विद्यार्थ्यांची प्रत्यक्ष कामासाठी पूर्वतयारी करणे, मुख्य प्रवाहातील पदवी अभ्यासक्रमांना प्रात्यक्षिक शिक्षणाची जोड देणे.

उपलब्ध होणारे अभ्यासक्रम व प्रमाणपत्रे : अकाउंटिंग, बिझनेस ऑपरेशन्स आणि जीएसटीशी संबंधित संरचित कोर्सेस.

प्रमुख कोर्सेस : '१. टॅली इसेन्शियल' (लेव्हल १, २ आणि ३), 'जीएसटी सिम्युलेशनसह टॅलीप्राईम' आणि 'टॅली प्रोफेशनल'.

टॅली एज्युकेशनकडून मिळणारे सहकार्य व सुविधा : डिजिटल अध्ययन सामग्री, पोर्टल आणि मोबाईल ॲपद्वारे अभ्यासक्रमांचा ॲक्सेस, सरावासाठी 'मॉक टेस्ट्स' व अधिकृत ऑनलाइन परीक्षा, यशस्वी विद्यार्थ्यांना डिजिटल प्रमाणपत्रे, टॅलीच्या जॉब पोर्टलद्वारे नोकरी व प्लेसमेंटसाठी साहाय्य, प्राध्यापकांना प्रशिक्षणाची सोय

महाविद्यालयांसाठी लाभ : शिक्षकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम, महाविद्यालयांमध्ये कौशल्योन्मुख अभ्यासक्रम प्रभावीपणे राबवण्यासाठी मदत, विद्यापीठ आणि उद्योगजगत यांमधील समन्वय अधिक मजबूत करणे.

विद्यार्थ्यांसाठी थेट फायदे : अत्यंत सवलतीच्या दरामध्ये विद्यार्थ्यांना हा कोर्स करायला मिळणार आहे, शिवाजी विद्यापीठ आणि टॅली शिक्षण आणि वितरण संस्थेचे प्रमाणपत्र प्राप्त होईल, रोजगारक्षमतेत वाढ आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे हा कोर्स अत्यंत सवलतीच्या दरामध्ये एक ॲडऑन कोर्स म्हणून उपलब्ध केला आहे.

0 4 NOV 2026

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

शिक्षणात डिजिटल परिवर्तनासाठी तंत्रज्ञान महत्त्वाचे

कुलगुरू डॉ. कामत : विद्यापीठात फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रामचे उद्घाटन

कोल्हापूर : शिक्षणातील डिजिटल परिवर्तनासाठी तंत्रज्ञानाची भूमिका महत्त्वाची आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र व महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांसाठी आयोजित 'ई-कंटेंट विकसन' या विषयावरील तीनदिवसीय फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्थेच्या नवनिर्मिती आणि अद्ययावत तंत्रज्ञान केंद्रप्रमुख इंजि. सूरजकुमार बावर, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या संगणक विभागाचे डॉ. सुहास पाचपांडे, राज्य अध्यापक विकास संस्थेचे डॉ. भार्गव वाळुंज, उपकुलसचिव विनय शिंदे आदी उपस्थित होते.



कोल्हापूर : विद्यापीठात फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी मान्यवर.

कुलगुरू डॉ. कामत म्हणाले, ई-कंटेंटचे महत्त्व आजच्या काळात शिक्षण क्षेत्राच्या परिवर्तनाच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचे आहे. स्वयम, मूक यासारख्या माध्यमातून विद्यार्थ्यांना निःशुल्क स्वरूपात ज्ञान प्राप्त करण्याची संधी मिळते. कारण या कोर्सेसना प्रवेशासाठी कोणतेही शुल्क नसते, केवळ प्रमाणपत्र शुल्क असते. ई-कंटेंटच्या फोरमद्वारे विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे साहित्य उपलब्ध केले जाते.

सूरजकुमार बावर म्हणाले, सध्याच्या बदलत्या डिजिटल गरजा ओळखून सर्व शिक्षकांनी ई-कंटेंट निर्मितीच्या आधुनिक पद्धती समजून घेऊन, दर्जेदार शैक्षणिक साहित्य तयार करणे अपेक्षित आहे, जेणेकरून विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे ज्ञान पोहोचू शकेल. संचालक डॉ. प्रतिभा पाटणकर यांनी प्रास्ताविक केले. समन्वयक डॉ. कृष्णा पाटील यांनी परिचय करून दिला. प्रियांका सुर्वे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. नगीना माळी यांनी आभार मानले.

04 NOV 2026

सिंधुदुर्ग समाचार

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाधारित कौशल्ये देण्याची गरज : कुलगुरु डॉ. कामत

कोल्हापूर/प्रतिनिधी :

आजच्या काळात विद्यार्थ्यांना केवळ पारंपरिक शिक्षण देऊन चालणार नाही, तर त्यांना तंत्रज्ञानावर आधारित कौशल्ये देणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने टॅली एज्युकेशनसमवेत झालेला सामंजस्य करार महत्त्वाचा ठरेल, अशी अपेक्षा शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. (डॉ.) राजनीश कामत यांनी व्यक्त केली. शिवाजी विद्यापीठ आणि टॅली एज्युकेशन अँड डिस्ट्रिब्युशन सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड यांच्यात आज सामंजस्य करार करण्यात आला. त्या वेळी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. कामत म्हणाले, या सामंजस्य करारामुळे विद्यार्थ्यांची रोजगारक्षमता वाढण्यास मोठी मदत होईल. तसेच इंटर्नशिपच्या संधी उपलब्ध करून देणे सुलभ होईल. उद्योग व व्यवसाय क्षेत्राच्या गरजा ओळखून विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करणे हे विद्यापीठाचे उद्दिष्ट आहे आणि हा करार त्या दिशेने महत्त्वाचे पाऊल आहे.

टॅली एज्युकेशनच्या कार्यकारी उपाध्यक्ष भुवनेश्वरी बी. म्हणाल्या, शैक्षणिक संस्था आणि कौशल्य प्रशिक्षण देणाऱ्या संस्था यांनी हातात हात घालून काम केले, तरच विद्यार्थ्यांना



काळाच्या गरजेनुसार शिक्षण देता येईल. या सामंजस्य करारामुळे विद्यार्थ्यांना लेखाशास्त्र (अकाउंटिंग) आणि वित्त (फायनान्स) या विषयांचे प्रत्यक्ष व्यावहारिक शिक्षण सवलतीच्या शुल्कात उपलब्ध होईल. त्यामुळे विद्यार्थ्यांना केवळ सैद्धांतिक ज्ञानच नव्हे, तर प्रत्यक्ष कामाचा अनुभवही मिळेल.

या करारांतर्गत टॅलीचे प्रमाणपत्र (सर्टिफिकेट), पदविका (डिप्लोमा) आणि प्रगत पदविका (ॲडव्हान्स्ड डिप्लोमा) असे विविध अभ्यासक्रम विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून दिले जाणार आहेत.

लेखा, वित्त, जीएसटी व करप्रणाली, वेतन (पे-रोल) आणि साठा व्यवस्थापन यांसाठी टॅली सॉफ्टवेअर व्यापार, उद्योग आणि व्यावसायिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर वापरले जाते. त्यामुळे टॅलीचे प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना लेखा व वित्त क्षेत्रात नोकरीच्या तसेच स्वयंरोजगाराच्या अधिक संधी मिळू शकतात. विशेषतः वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांसाठी हे प्रशिक्षण उपयुक्त ठरणार आहे. हे अभ्यासक्रम विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांत राबविले जाणार आहेत. त्यामुळे हजारो विद्यार्थ्यांना याचा थेट लाभ होणार आहे. ग्रामीण व निमशहरी भागातील विद्यार्थ्यांनाही दर्जेदार कौशल्य प्रशिक्षण मिळण्याची संधी यातून निर्माण होईल.

सामंजस्य करारावर विद्यापीठाच्या वतीने कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी तर टॅली एज्युकेशनच्या वतीने कार्यकारी उपाध्यक्ष भुवनेश्वरी बी. यांनी स्वाक्षरी केल्या.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, व्यवस्थापन परिषद सदस्य अँड. स्वागत परुळेकर, अधिसभा सदस्य काव्यश्री नलावडे, मनोज पाटील, श्रीनिवास गायकवाड, डॉ. तेजपाल मोहरेकर, पंकज शहा, गिरीश राठी यांच्यासह वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागातील संशोधक, विद्यार्थी उपस्थित होते. वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे प्रमुख डॉ. केदार मारुलकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. टॅली एज्युकेशनचे सहायक व्यवस्थापक तथा क्षेत्रीय व्यवस्थापक (पश्चिम) श्री. चिंतामणी पाटील यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 4 NOV 2026 पुढारी



शिवाजी विद्यापीठाला पश्चिम विभागीय वेटलिफ्टिंग स्पर्धेचे सर्वसाधारण उपविजेतेपद

कोल्हापूर : गुजरात येथे झालेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ महिलांच्या वेटलिफ्टिंग स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाने ३ सुवर्ण व एक रौप्यपदकासह सर्वसाधारण उपविजेतेपदाचा मान मिळविला. संघातील अस्मिता ढोणे, श्रावणी जाधव, ईश्वरी पोवार (तिघींना सुवर्णपदक), राजनंदिनी आमने (रौप्य), श्रद्धा होनमोरे (पाचवी), साक्षी सांदुगडे (सहावी), वेदिका टोले (नववी), प्राची देबाजे (बारावी) असे यश मिळविले. पदक विजेत्या खेळाडूंची निवड अखिल भारतीय स्पर्धेसाठी झाली आहे. सर्वांना कुलगुरू प्रा. डॉ. आर. के. कामत, प्र -कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, क्रीडा संचालक प्रा. डॉ. शरद बनसोडे, प्रा. डॉ. रवींद्र चव्हाण, प्रा. डॉ. प्रशांत पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.